MHSO130006822021

दाखल तारीख – १२/१०/२०२१
नोंदणी तारीख – १३/१०/२०२१
निकाल तारीख – २९/०४/२०२६
कालावधी–**०४ वर्षे ०६ महिने १७ दिवस**

**तिसरे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, बार्शी यांचे न्यायालयात**
**(पीठासीन अधिकारीः– श्रीमती ह. उ. उ. पाटील)**

**नियमित दिवाणी दावा क्रमांक ५५५/२०२१**                **निशाणी क्र. ५०**

**बाळकृष्ण शंकर कांबळे,**
वय – ८२ वर्षे, धंदा – शेती,
रा. भोसरे, ता. माढा, जि. सोलापूर          -- **वादी**

**विरुध्द**

**सुधाकर भारत भडकवाड,**
वय – ४३ वर्षे, धंदा – शेती,                -- **प्रतिवादी**
रा. सुर्डी, ता. बार्शी, जि. सोलापूर

======================================

वादीतर्फे विधीज्ञ – श्री. आर. एन. गुंड
प्रतिवादीतर्फे विधीज्ञ – श्री. एम.पी. चव्हाण, श्री. ए. एन. आलाट

======================================

**न्यायनिर्णय**
**(घोषणा तारीख– २९ एप्रिल २०२६)**

प्रस्तुत दावा हा वादीने प्रतिवादी विरुध्द निरंतर मनाईकरिता दाखल केला आहे.

२. **दावा मिळकतीचे वर्णन :–**

डि. सोलापूर सब डि. वैराग व ता. बार्शी पैकी मौजे सुर्डी येथील शेत

जमिनीचे वर्णन खालीलप्रमाणे –

| गट क्र. | क्षेत्र हे. आर | आकार रु. पै | चतुःसिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | पुर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर |
| १०९/३ पैकी उत्तर बाजूचे | ००–८१ | ००–९१ | इर्ले शिव | सदर गटापैकी क्षेत्र | गट क्र. ९४, ९६ व १०८ | गट क्र. १०६, १०७ व १०८ |

येणेप्रमाणे वर्णनाची शेतजमीन आतील झाड, झुडपे वगैरे तदंगभुत वस्तुसह.

सदर मिळकतीचे विस्तृत वर्णन दावा परिच्छेद क्रमांक १ मध्ये नमुद केले आहे. सदर मिळकतीस यापुढे सोयीसाठी ''दावा मिळकत'' असे संबोधले जाईल.

३. **<u>वादीचे दाव्यातील कथन थोडक्यात असे आहे की,</u>**

वादीने दावा मिळकत श्री. परमेश्वर प्रभाकर तुपसमुद्रे यांना ता. २९/१२/२०२० रोजी खरेदी मोबदला रक्कम रू. ३,२५,०००/– देवून खरेदी केली असून खरेदीचा दस्त तुपसमुद्रे यांनी वादीचे हक्कात वैराग येथील दुय्यम निबंधक कार्यालयात दस्त नं. वरग २२२६/२०२० अन्वये लिहून नोंदवून दिला आहे. खरेदी दस्ताप्रमाणे वादीची ७/१२ हक्कपत्रकी फेरफार नं. १०५८६ अन्वये नोंद झाली आहे. सदर खरेदी दिवशीच वादीस दावा मिळकतीचा प्रत्यक्ष कब्जा मिळाला असून खरेदीपासून यातील वादी हा दावा मिळकतीवर मालकी हक्काने काबीज राहून हरजिनसी उत्पन्न, वापर उपभोग घेत आला आहे. दावा मिळकत ही प्रतिवादी कडून परमेश्वर प्रभाकर तुपसमुद्रे यांनी ता. २५/१०/२०१३ रोजी खरेदी केली आहे. तेव्हापासून दावा मिळकतीशी यातील प्रतिवादी यांचा काहीएक हक्क हितसंबंध राहीला नव्हता व नाही. दावा मिळकत ही वादी यांनी तुपसमुद्रे कडून खरेदी केले नंतर विनाकारण वादीचे नोंदीस प्रतिवादी यांनी हरकत तक्रार नोंदवली होती. दावा मिळकत खरेदी केलेपासून प्रतिवादी हा वादी विरूध्द तक्रारी देणे तसेच कब्जे वहीवाटीस हरकत अडथळा करण्याची धमकी देणे वगैरे गैरकृत्य सातत्याने करीत आहे. परंतु दावा मिळकत ही खरेदी करण्यापुर्वी वादीने दैनिक ''पुढारी'', सोलापूर आवृत्ती या वर्तमानपत्रात खरेदी पुर्व जाहीर नोटीस दिली होती. त्यावेळी प्रतिवादी यांनी

कोणत्याही प्रकारची तक्रार, हरकत घेतली नव्हती व नाही. यातील वादी हे दावा मिळकतीवर मालकी हक्काने काबीज राहून हर जिनसी उत्पन्न घेत आहेत. वादीने दावा मिळकतीमध्ये भरपूर सुधारणा करून जमीनीचा पोत सुधारला आहे. दावा जमीनीतून उत्पन्न ही चांगले येवू लागले आहे. वादीची सदर प्रगती प्रतिवादीस न पहावलेने प्रतिवादी हे दावा जमीनीत वादीचे कब्जे वहीवाटीस हरकत अडथळा करण्याचा प्रयत्न सतत करीत आहेत.

४.  वादीचे कथन असे की, दावा जमीन ही प्रतिवादीस अत्यल्प रक्कमेत खरेदी करावयाची होती. परंतु वादीने बाजार भावाने किमत देवून शेतजमीन खरेदी केलेचा राग मनात धरून प्रतिवादी हे वादी विरूध्द वागणूक करत आहेत, प्रसंगी अंगावर धावून येत आहेत, शिवीगाळ करीत आहेत. यातील वादी हे वयोवृध्द असलेचा गैरफायदा प्रतिवादी घेत आहेत. वादी हे भोसरे, ता. माढा येथील रहीवाशी आहेत. त्यांचे मनुष्यबळ कमी आहे. याउलट प्रतिवादी यांचेकडे मनुष्यबळ आहे. प्रतिवादी हे दावा मिळकत असलेल्या गावचे रहिवाशी असल्याने ते वादीस सातत्याने आरेरावी करून दावा मिळकतीची मेहनत, मशागत, वापर, उपभोग घेणेपासून मज्जाव करीत आहेत. त्याबाबत प्रतिवादीस वादीने अनेकदा आपसात समजावले परंतु प्रतिवादी त्यांना जुमानत नाहीत. प्रतिवादी मजूरीने आलेल्या लोकांना शिव्या देतात, त्यांना दमदाटी करणे, वादीचे शेतजमीनी मधील कब्जे वहीवाटीस हरकत अडथळा निर्माण करणे, वादीस दावा मिळकतीतून बेदखल करणे, वादीच्या उभ्या पिकात जनावरे सोडणे अशी गैरकृत्ये करीत आहेत. त्यामुळे दावा जमीन वहीवाटणे वादीस त्रासदायक होत आहे.

५.  दि. १०/१०/२०२१ रोजी वादी दावा जमीनीत सोयाबीन पिक काढीत असताना प्रतिवादी हे अनाधिकाराने आले व वादीस ''तू जमीन का खरेदी केली?'' असे म्हणून दमदाटी करू लागले. तसेच सोयाबीन काढायचे नाही म्हणून आडवे उभे राहीले. प्रतिवादी हे वादीस शेत जमीनीमधील पिक काढण्यास, मेहनत, मशागत करणेस हरकत अडथळा करण्याचा प्रयत्न करीत आहेत. प्रतिवादीचे दहशतीमुळे वादीचे कायदेशीर मालकी हक्कावर गदा येवू लागली आहे. वादीस हरकत होवू लागली आहे. प्रतिवादीचे सदरील हरकती या बेकायदेशीर व अनाधिकाराच्या असून त्यांना तसे करणेचा कुठलाही कायदेशीर

हक्क अधिकार नाही. प्रतिवादी हे गुंडगिरीची भाषा करतात, हरकत अडथळा करणेचे सतत प्रयत्नात असतात. प्रतिवादीचे सततचे हरकतीमुळे वादीस दावा जमीन वहिवाटणे अडचणीचे झाले आहे. त्यामुळे वादीची जमीन पडीक व नापिक होणार आहे. तसेच प्रतिवादीचे गैरकृत्य वाढतच गेले, तर सदर वादाचे अनेकीकरण होवून अनेकविध दावे, प्रतिदावे होवून गुंतागुंत निर्माण होणार आहे व वादीचे कधीही न भरून येणारे नुकसान होणार आहे. सबब, प्रतिवादीने स्वतः अगर त्याचे नोकर, नातेवाईक, कुटूंबीय वा इतरांमार्फत वादीचे दावा मिळकती मधील शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा प्रतिबंध होईल असे कोणतेही गैरकृत्य करू नये असा निरंतर ताकीदीचा हुकूमनामा प्रतिवादी विरूध्द व्हावा यासाठी वादीने प्रस्तुत दावा दाखल केला आहे. वादीची विनंती की, प्रतिवादी यांनी स्वतः अगर त्याचे नोकर, नातेवाईक, कुटूंबीय वा इतरामार्फत यातील वादीचे दावा मिळकतीतील शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा प्रतिबंध होईल असे कोणतेही गैरकृत्य करू नये अशी निरंतरची ताकीदी देण्यात यावी तसेच या दाव्याचा संपूर्ण खर्च यातील वादीस प्रतिवादी कडून मिळावा.

**<u>प्रतिवादीचे कथनः–</u>**

६. प्रतिवादीने कैफियत (नि. क्र. ३६) दाखल करुन वादीचे सर्व कथने नाकारली आहेत. प्रतिवादीचे कथन असे की, सदर दाव्यास कारण घडले नसलेमुळे तो रद्द करणेत यावा. प्रतिवादीचे मते सदर दावा चालणेस पात्र नाही. प्रतिवादीचे कथन असे की, दावा मिळकत ही सन २०१० साली त्याने श्री. चांगदेव भगवान कदम यांचेकडून रजिस्टर खरेदीखत दस्तअन्वये खरेदी केली असून तेंव्हापासून आजतागायत प्रतिवादीचा सदर मिळकतीमध्ये ताबा व कब्जे वहिवाट आहे. तसेच सदर मिळकत ही प्रतिवादीची स्वकष्टार्जीत व खरेदी मालकीची असून तो कुटुंबासह सदर मिळकतीमध्ये राहाणेस आहे.

७. प्रतिवादीने त्याचे कौटुंबिक व आर्थिक अडचणीमुळे मौजे इर्लै, ता. बार्शी जि. सोलापूर येथील खाजगी सावकार नामे परमेश्वर तुपसमुद्रे यांचेकडे रु. ३,००,०००/– एवढया रकमेची मागणी केली. त्यावेळी सदर परमेश्वर तुपसमुद्रे यांनी रक्कमेस ५ टक्के दरमहा व्याज द्यावे लागेल तसेच प्रतिवादीचे शेतजमिनीची पोकळ खरेदी करुन द्यावी लागेल अशी

अट घातली. सदर रकमेची परतफेड झालेनंतर प्रतिवादीस त्याची मिळकत फेरखरेदी करुन मिळकतीचा ताबा प्रतिवादीकडे राहिल असे तुपसमुद्रे व प्रतिवादी यांचेत ठरले. त्याप्रमाणे सदर जमिनीचा कब्जा प्रतिवादीकडे असून सदर जमिनीवर खरेदीदार तुपसमुद्रे याचा कधीही कब्जा नव्हता व नाही. खाजगी सावकार तुपसमुद्रे यांचे वतीने व्याजाची रक्कम वसुल करणेसाठी इसम आनंदराव मस्तुद हे प्रतिवादीस भेटत असत व वेळोवेळी व्याजाची व मुद्दल रक्कम घेत असत. प्रतिवादीस पैशाची अत्यंत निकड असलेने तो सावकारी व्यवहारास नाईलाजास्तव तयार झाला. त्याप्रमाणे त्याने तुपसमुद्रे यांना सदर रकमेस तारण म्हणून पोकळ खरेदीखत नोंदवून दिले. प्रतिवादी व तुपसमुद्रे यांचेमध्ये ठरलेप्रमाणे दावा मिळकतीचे पोकळ खरेदीखत झाले असताना त्याचा कब्जा प्रतिवादीकडेच होता. प्रतिवादीकडे मौजे सुर्डी येथील शेतजमीन गट क्र. १०९/३ क्षेत्र ०० हे० ८१ आर वगळता इतर कोणतेही उपजीविकेचे साधन नव्हते व नाही.

८. प्रतिवादीचे कथन असे की, त्याने तुपसमुद्रे यांचेकडून घेतलेली कर्जाची रक्कम मुद्दल व व्याज आनंदराव मस्तुद याचेकडे वेळोवेळी देत असलेने व शेतजमिनीचा ताबा प्रतिवादीकडे असलेने खाजगी सावकार तुपसमुद्रे याने प्रतिवादीचे शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा केला नाही. प्रतिवादीने तुपसमुद्रे यांना रक्कम रु. २,००,०००/– परतफेड केली आहे.

९. प्रतिवादीचे कथन असे की, वादी व प्रतिवादी यांचेमध्ये कायम खुष खरेदीचा व्यवहार झाला नसून केवळ रु.३,००,०००/– चा तारण म्हणून पोकळ विना कब्जाचा दस्त झाला आहे. त्यानुसार तुपसमुद्रे यांनी सदर मिळकत प्रतिवादीस कोणतीही पुर्वकल्पना न देता व्यवहारापुर्वी ठरलेप्रमाणे इतर कोणत्याही त्रयस्थ इसमास विक्री न करण्याचे ठरले असताना देखील सदर मिळकत वादीस प्रतिवादीचा विश्वासघात करुन फसवणूक करणेसाठी विना कब्जा विकली आहे. वादीस मिळकत खरेदी करताना त्याबाबत सर्व कल्पना असताना सावकारकीच्या व्यवहारातील जमीन कमी पैशात गिळंकृत करणेसाठी खरेदी केली. प्रतिवादी हा अशिक्षित अडाणी असून वादी व खाजगी सावकार तुपसमुद्रे हे धनधदांडगे व राजकीय आश्रीत असलेने प्रतिवादीचे शांततामय कब्जे वहिवाटीस विनाकारण

नाहक त्रास देण्याचे व सदर मिळकत आबळस करण्याचे दुष्ट हेतूने सदर दावा दाखल केला आहे.

१०.        प्रतिवादीचे कथन असे की, दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी व्यतिरिक्त कोणाचीही कब्जे वहिवाट नाही. तो पुर्वीपासून नियमीत पिके घेवून जमिनीची मशागत करत आहे. सदर मिळकतीमध्ये खाजगी सावकार तुपसमुद्रे व वादी कधीही आले नाहीत. त्यांनी कधीही सोयाबीन अथवा इतर कोणतीही पिके लावली नव्हती व नाहीत. त्यामुळे वादीचे म्हणणेनुसार दि. १०/१०/२०२१ रोजी कोणतेही संयुक्तिक कारण घडले नसताना वादीने विनाकारण दावा दाखल केला आहे. सदर मिळकतीमध्ये फक्त प्रतिवादीचा कब्जा आहे. त्यामुळे वादीचा दावा मंजूर केलेस प्रतिवादीची उपासमार होवून त्याचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे प्रतिवादीने प्रस्तुत दावा नामंजूर करणेत यावा अशी विनंती केली.

११.        सदर दाव्यामध्ये वादीचे वादपत्र व प्रतिवादीचे कैफियत मधील कथनांप्रमाणे खालील वादमुद्दे (निशाणी क्र. ३८) निश्चीत करण्यात आले. मी त्यासमोर माझे निष्कर्ष नोंदविलेले असून त्याखाली त्याची कारणे नमुद केली आहेत.

| अ. क्र. | वादमुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीने हे सिध्द केले आहे का की, दावा दाखल करतेवेळी वादीची दावा मिळकतीमध्ये मालक महणून कायदेशीर कब्जे वहिवाट होती व आहे ? | **नकारार्थी** |
| २. | वादीने हे सिध्द केले आहे का की, प्रतिवादी वादीचे दावा मिळकतीतील कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करत आहे? | **नकारार्थी** |
| ३. | प्रतिवादीने हे सिध्द केले का की, दावा मिळकत त्याने परमेश्वर तुपसमुद्रे यांना गहाण म्हणून दिली होती ? | **नकारार्थी** |

| | | |
|---|---|---|
| ४. | प्रतिवादीने हे सिध्द केले का की, दावा मिळकतीमध्ये त्याची कब्जे वहिवाट आहे ? | **नकारार्थी** |
| ५. | वादीने हे सिध्द केले आहे का की, वादी निरंतर मनाई आदेशास पात्र आहे? | **नकारार्थी** |
| ६. | दावा चालणेस पात्र आहे का ? | **होकारार्थी** |
| ७. | सदर दाव्यास कारण घडले आहे का ? | **नकारार्थी** |
| ८. | काय आदेश ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

**पुरावा –**

१२. वादीने दाव्याचे पृष्ठयर्थ वादीतर्फे कुलमुखत्यार सौ. वंदना धनंजय कांबळे हिचे पुराव्याचे शपथपत्र (नि. क्र. ३१ व ४१) दाखल केले आहे. तसेच वादीतर्फे कागदपत्रांची यादी (नि. क्र. ४, ८, १२, २५, ३०) लगत कागदपत्रे दाखल करणेत आली आहेत. सदर कागदपत्रे कारणमीमांसेमध्ये संबंधीत वेळी चर्चिले जातील.

१३. सदर प्रकरणामध्ये प्रतिवादी यास वारंवार संधी देवून सुध्दा प्रतिवादीतर्फे बचाव पुरावा सादर करणेत आला नाही. त्यामुळे दि. ०१/१०/२०२५ रोजी प्रतिवादी विरुध्द पुरावा नाही असा आदेश पारीत करणेत आला. सदर प्रकरणामध्ये प्रतिवादीतर्फे कागदपत्रांची यादी (नि. २७ व २१) लगत कागदपत्रे दाखल करणेत आली आहेत. परंतु सदर कागदपत्रे प्रतिवादीने पुरावा सादर करुन शाबीत केली नाहीत. त्यामुळे सदर कागदपत्रे पुराव्यामध्ये वाचता येणार नाहीत.

१४. वादीतर्फे विधीज्ञ श्री. आर. एम. गुंड यांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादीतर्फे विधीज्ञ यांना वारंवार संधी देवून सुध्दा त्यांनी युक्तिवाद केला नाही. त्यामुळे दि. १३/०३/२०२६ रोजी नि. १ वर त्यांचे विरुध्द युक्तिवाद नाही असा आदेश पारीत करणेत आला.

## कारणमीमांसा

**वादमुद्दा क्र. १ करीताः–**

१५. वादीने सदर दाव्यामध्ये प्रतिवादी विरुध्द निरंतर मनाई आदेश पारीत

करण्यात यावा अशी विनंती केली आहे. सदर अनुतोष प्राप्त करणेकरीता वादीस दावा दाखल करतेवेळी दावा मिळकतीमध्ये त्याचा कायदेशीर कब्जा होता व आजअखेर आहे ही बाब शाबीत करणे आवश्यक आहे.

१६. वादीचे वादपत्रातील कथन असे की, त्याने दावा मिळकत श्री. परमेश्वर प्रभाकर तुपसमुद्रे यांचेकडून दि. २९/१२/२०२० रोजी खरेदी दस्त क्र. वरग/२२२६/२०२० अन्वये रक्कम रु. ३,२५,०००/– मोबदला देवून खरेदी केली आहे. सदर खरेदी दिवशीच वादीस दावा मिळकतीचा प्रत्यक्ष कब्जा मिळाला असून तेंव्हापासून वादी सदर मिळकतीचा उपभोग घेत आहे. याउलट प्रतिवादीचे कथन असे की, प्रतिवादीने आर्थिक अडचणीमुळे परमेश्वर तुपसमुद्रे या खाजगी सावकारास सदर मिळकतीचे पोकळ बिन कब्जाचे खरेदीखत नोंदवून दिले होते. सदर मिळकतीचा कब्जा हा प्रतिवादीकडे आहे. वादीने तुपसमुद्रे यांचेकडून नोंदवून घेतलेले खरेदीखत हे प्रतिवादीचे फसवणूक करुन घेतले आहे. दावा मिळकत ही वादीचे कब्जात नसून प्रतिवादीचे कब्जात आहे असे प्रतिवादीने कथन केले आहे.

१७. वादीतर्फे विधीज्ञांनी युक्तिवाद केला की, वादीने सदर दाव्याचे पुष्टयर्थ तोंडी पुरावा दाखल केला आहे. तसेच दावा मिळकतीचा ७/१२ उतारा सदरी वादीचे नाव भोगवटदार म्हणून आहे. प्रतिवादीतर्फे वादीचा पुरावा आव्हानीत करणेत आला नाही. त्यामुळे सदर लेखी व तोंडी पुराव्या आधारे वादीची दावा मिळकतीमध्ये कब्जे वहिवाट आहे ही बाब शाबीत होते. वादीतर्फे विधीज्ञांचे युक्तिवादाचे अनुषंगाने हे नमुद करणे जरुरीचे की, वादीने त्यावरील दायित्व पूर्ण करणेकरीता तोंडी व लेखी पुरावा सादर केला आहे. प्रतिवादीतर्फे सदर पुरावा आव्हानीत करणेत आला नाही. परंतु वादीतर्फे दाखल पुरावा हा वैध आहे व त्याचे महत्व किती आहे, सदर पुरावा ग्राहय आहे का, याची पडताळणी करणे न्यायालयाचे दायित्व आहे.

१८. प्रस्तुत दावा वादीतर्फे व्यक्तिगतरित्या दाखल करणेत आला आहे. परंतु वादीने सदर दाव्याचे पुष्टयर्थ स्वतःची साक्ष नोंदवली नाही अथवा पुराव्याचे शपथपत्र दिले

नाही. वादीतर्फे कुलमुखत्यार सौ. वंदना धनंजय कांबळे हिचे सरतपासाचे शपथपत्र (नि. क्र. ३१ व नि. ४१) दाखल करणेत आले आहे. प्रतिवादीतर्फे सदर साक्षीदाराचा उलटतपास घेणेत आला नाही. त्यामुळे प्रतिवादी विरुध्द उलटतपास नाही असा आदेश पारीत करणेत आला आहे. त्यामुळे सदर साक्षीदाराचा तोंडी पुरावा विना आव्हानीत राहिला आहे.

१९. सदर साक्षीदाराचे पुराव्या आधारे कुलमुखत्यारपत्र (नि. ४९) शाबीत झाले आहे. सदर कुलमुखत्यारपत्राचे अवलोकन केले असता त्यावरुन वादी बाळकृष्ण कांबळे यांनी साक्षीदार वंदना कांबळे हिस रेग्युलर मुकदमा क्र. ५५५/२०२१ म्हणजे प्रस्तुत दाव्यामध्ये साक्षी पुरावा देण्याचे अधिकार दिले आहेत असे निष्पण्ण होते. याठिकाणी हे नमुद करणे जरुरीचे की, सदर साक्षीदाराचा तोंडी पुरावा व कुलमुखत्यारपत्र यावरुन वादीचे वय झाले असून ते सतत आजारी असतात व त्यांना स्पष्ट ऐकू येत नाही व प्रत्यक्ष कोर्टात हजर राहाणे शक्य नाही या कारणास्तव कुलमुखत्यारपत्र साक्षीदाराचे लाभामध्ये देण्यात आले आहे. परंतु अशा परिस्थितीमध्ये सदर साक्षीदाराची साक्ष न्यायालयीन आयोगाची नेमणूक करुन नोंदवणेची तरतूद दिवाणी प्रक्रिया संहिता कलम ७५ व आदेश २६ नुसार उपलब्ध आहे. परंतु वादीतर्फे त्या पध्दतीने कोणतीही कार्यवाही करणेत आली नाही. सदर प्रकरणामध्ये वादीचा तोंडी पुरावा अत्यंत महत्वपूर्ण आहे. परंतु वादीतर्फे वादीचा तोंडी पुरावा अभिलेखावर सादर करणेत आला नाही. ही प्रस्तुत दाव्यातील महत्वपूर्ण त्रुटी आहे.

२०. उपरोक्त चर्चिलेप्रमाणे वादीने कुलमुखत्यार वंदना कांबळे हिस सदर प्रकरणामध्ये साक्षी पुरावा देणेबाबत अधिकार दिले आहेत. अशा परिस्थितीत कुलमुखत्यार वंदना कांबळे हिचा वादीतर्फे कुलमुखत्यार म्हणून पुरावा ग्राहय आहे का याची पडताळणी करणे आवश्यक आहे. सदर प्रकरणामध्ये वादी हा प्रकर्ता (principal)असून वादीतर्फे मुखत्यार हे अभिकर्ता (agent) आहेत. याठिकाणी हे नमुद करणे जरुरीचे की, कायदेशीर तरतुदी व प्रस्थापित न्यायतत्व यांचे नुसार वादीतर्फे अभिकर्ता म्हणून कुलमुखत्यार मार्फत दावा दाखल केला जावू शकतो परंतु कुलमुखत्यार म्हणजे अभिकर्ता प्रकर्ताचे म्हणजे वादीचे जागी साक्ष देवू शकत नाही. कुलमुखत्यार केवळ त्याला ज्या तथ्याचे व्यक्तिगत ज्ञान व माहिती आहे केवळ त्या तथ्याबाबत साक्ष देवू शकतो व त्या बाबत त्याचा पुरावा ग्राहय

धरला जावू शकतो.

२१. वादीतर्फे कुलमुखत्यार वंदना कांबळे हिने तिचे सरतपासाचे शपथपत्र (नि. क्र. ४१) वर कथन केले की, ती वादी यांची सुन आहे. वादी हे वयोवृध्द असलेने ते सतत आजारी असतात तसेच वाद मिळकतीबाबत तिला व्यक्तिशा संपूर्ण माहिती असलेने तसेच तिचे हक्कात कुलमुखत्यारपत्राचा दस्त करुन दिला असलेने सदर अधिकाराने तिने पुराव्याचे शपथपत्र दाखल केले आहे.

२२. वादीचे वादपत्रातील कथन असे की, दि. २९/१२/२०२० रोजी त्याने परमेश्वर प्रभाकर तुपसमुद्रे यांचेकडून दावा मिळकत खरेदी केली आहे. परंतु वादपत्रामध्ये सदर खरेदी वादीने कुलमुखत्यारमार्फत केली आहे असे स्पष्ट कथन केले नाही. तसेच सदर खरेदीखत करतेवेळी कुलमुखत्यार हजर होते असे देखील स्पष्ट कथन वादपत्रामध्ये नाही. महत्वाची बाब म्हणजे कुलमुखत्यार वंदना कांबळे हिने तिचे शपथपत्रामध्ये वादीने सदर मिळकत खरेदी केलेबाबत कथन केले आहे. परंतु तिने देखील सदर खरेदीखत नोंदवतेवेळी अथवा व्यवहारावेळी ती समक्ष हजर होती असे कोणतेही स्पष्ट कथन केले नाही. तसेच वादीतर्फे सदर खरेदखत देखील शाबीत करणेत आले नाही. त्यामुळे सदर व्यवहार कुलमुखत्यार मार्फत करणेत आला आहे अथवा सदर व्यवहाराची कुलमुखत्यार वंदना कांबळे हिस व्यक्तिगत माहिती आहे असे स्पष्टपणे शाबीत करणारा पुरावा अभिलेखावर नाही.

२३. याठिकाणी हे नमुद करणे जरुरीचे की, कुलमुखत्यार वादीतर्फे वादीचे माहितीमध्ये असलेल्या तथ्यांचे साक्ष देत असेल तर तो पुरावा ग्राहय धरला जावू शकत नाही. कुलमुखत्यार यास त्याबाबत व्यक्तिगत माहिती असलेस स्वतंत्र साक्षीदार म्हणून त्याचा पुरावा ग्राहय धरला जावू शकतो. परंतु कुलमुखत्यार वादीचे जागी येवून साक्ष देत असलेस त्याचा पुरावा ग्राहय धरता येणार नाही. उपरोक्त चर्चिलेप्रमाणे कुलमुखत्यार वंदना कांबळे हिस वादी व परमेश्वर तुपसमुद्रे यांचेतील व्यवहाराची व्यक्तिगत माहिती आहे असे अभिलेखावरुन स्पष्ट होत नाही. त्यामुळे सदर व्यवहार शाबीतीकरीता तिचा तोंडी पुरावा

ग्राहय धरता येणार नाही. सदर खरेदी व्यवहार शाबीत करणेकरीता वादीतर्फे सक्षम पुरावा सादर करणेत आला नाही. ही सदर दाव्यातील गंभीर त्रुटी आहे.

२४. दिवाणी प्रकरणामध्ये एखादे तथ्य शाबीत करणेकरीता तोंडी पुराव्यासोबत लेखी पुरावा सुध्दा अत्यंत महत्वपूर्ण पुरावा आहे. वादीचे वादपत्रातील कथन असे की, त्याने परमेश्वर तुपसमुद्रे यांचेकडून दावा मिळकत खरेदी केली असून तो सदर मिळकतीचा वहिवाटदार आहे. सदर बाब शाबीत करणेकरीता वादीतर्फे दावा मिळकतीचा ७/१२ (नि. क्र. ४२) उतारा व फेरफार क्र. १०५८६ (नि. क्र. ४३) आधार घेण्यात आला आहे. मौजे सुर्डी, ता. बार्शी जि. सोलापूर येथील फेरफार क्र. १०५८६ चे अवलोकन केले असता असे निष्पण्ण होते की, खरेदी दस्त क्र. २२८६ दि. २९/१२/२०२० प्रमाणे वादीचे नावाची नोंद गट क्र. १०९/३ प्रमाणित करणेत आली आहे. तसेच ७/१२ उतारा (नि. क्र. ४२) वरुन असे निष्पण्ण होते की, सदर उता–यावरुन परमेश्वर तुपसमुद्रे याचे नाव कमी करणेत आले असून वादीचे नाव भोगवटदार सदरी नोंद करणेत आले आहे. सदर ७/१२ उतारा व फेरफार उतारा आधारे खरेदीखत दस्त क्र. २२८६ याचा महसुल सदरी अंमल होवून वादीची गट क्र. १०९/३ चे हक्कपत्रकी नोंद झाली असली तरी दाव्यामध्ये नमुद वर्णनाची मिळकत वादीस हस्तांतरीत केली आहे हे त्यावरुन शाबीत होत नाही.

२५. वादीतर्फे ७/१२ उतारा व फेरफार उतारा आधारे दावा मिळकतीमध्ये त्याचा कब्जा आहे असा युक्तिवाद करणेत आला आहे. सदर मिळकतीचे ७/१२ उता–याप्रमाणे गट क्र. १०९/३ मध्ये इतर भोगवटदार देखील आहेत. त्यामुळे सदर उता–यावरुन वादीची गट क्र. १०९/३ मध्ये नेमकी कोणत्या भागामध्ये कब्जे वहिवाट आहे हे देखील स्पष्ट होत नाही. तसेच महत्वाची बाब म्हणजे ७/१२ उतारा अथवा हक्क अभिलेखामधील नोंदी या महसुल जमा करण्याचे उद्देशाने केल्या जातात. अशा परिस्थितीत सदर नोंदीच्या आधारे एखाद्या मिळकतीमध्ये एखाद्या व्यक्तीचा कब्जा आहे व तो कब्जा कायदेशीर आहे असा निष्कर्ष काढता येणार नाही. अशा परिस्थितीत प्रतिवादीचा बचाव ध्यानात घेता केवळ ७/१२ उतारा व फेरफार उतारा यावरुन वादीचा दावा मिळकतीमध्ये कायदेशीर कब्जा आहे असा निष्कर्ष काढता येणार नाही.

२६. वादीचे वादपत्रातील कथन असे की, दावा मिळकत त्याने खरेदीखत नोंदवून खरेदी केली असून दावा मिळकतीचा प्रत्यक्ष कब्जा त्यास मिळाला आहे. अशा परिस्थितीत वादीने दावा मिळकत खरेदी केली आहे व त्याला दावा मिळकतीचा कब्जा देणेत आला आहे याकरीता दावा मिळकतीचे खरेदीखत हा सर्वोत्तम पुरावा आहे. वादीने कागदपत्र यादी नि. क्र. ४ लगत सदर खरेदी दस्ताची झेरॉक्स प्रत दाखल केली आहे. परंतु वादीने सदर झेरॉक्स प्रत कायदेशीर तरतुदीप्रमाणे शाबीत केली नाही. त्यामुळे सदर झेरॉक्स प्रत पुरावा म्हणून वाचता येणार नाही. तसेच वादीने सदर खरेदीखताची मुळ प्रत अथवा प्रमाणित प्रत दाखल करुन ती कायदेशीर तरतुदीप्रमाणे शाबीत केली नाही. त्यामुळे सदर खरेदीखत शाबीत झाले नाही. अशा परिस्थितीत वादीस सदर प्रकरणामध्ये त्याचे कथनांचे पुष्टयर्थ सर्वोत्तम पुरावा सादर करणेस अपयश आले आहे.

२७. सदर दाव्यातील वादीची मागणी ध्यानात घेता दावा मिळकतीमध्ये वादीचा प्रत्यक्ष कायदेशीर कब्जा आहे ही बाब शाबीत होणे अत्यंत आवश्यक आहे. परंतु वादीने स्वतः न्यायालयामध्ये येवून शपथेवर त्याचा दावा मिळकतीमध्ये कब्जा आहे असे कथन केले नाही. सदर प्रकरणामध्ये उभय पक्षांची वाद कथने ध्यानात घेता असे निष्पण्ण होते की, प्रतिवादी हा दावा मिळकतीचा मुळ मालक होता. वादीचे कथन असे की, प्रतिवादीने सदर मिळकत परमेश्वर तुपसमुद्रे यांना विक्री केली आहे. परंतु वादीने त्या संदर्भात खरेदीखत सादर करुन ते शाबीत केले नाही. प्रतिवादीचा बचाव असा की, त्याने परमेश्वर तुपसमुद्रे यांचेकडून कर्ज घेतले असून गहाण स्वरुपी दावा मिळकतीचे बिनकब्जा पोकळ खरेदीखत करुन दिले होते. अशा परिस्थितीत सदर व्यवहाराचे स्वरुप निर्णाय करणेकरीता परमेश्वर तुपसमुद्रे याची साक्ष महत्वपूर्ण आहे. परंतु वादी अथवा प्रतिवादी यांनी त्याची साक्ष नोंदवली नाही. अशा परिस्थितीत प्रतिवादीकडून परमेश्वर तुपसमुद्रे यांचेकडे दावा मिळकतीचा कब्जा हस्तांतरीत करणेत आला होता किंवा कसे, याबाबत स्पष्ट पुरावा अभिलेखावर नाही.

२८. वादीचे कथन की, परमेश्वर तुपसमुद्रे यांनी दावा मिळकतीचे खरेदीखत त्याचे लाभात करुन दावा मिळकतीचा कब्जा वादीस दिला आहे. सदर बाब शाबीत करणेकरीता

दावा मिळकतीचे खरेदीखत हा महत्वपूर्ण व सर्वोत्तम पुरावा आहे. परंतु वादीतर्फे सदर खरेदीखत अभिलेखावर पुरावा म्हणून सादर करणेत आले नाही. तसेच वादीने स्वतः याबाबत साक्ष देवून कथन केले नाही. त्यामुळे दावा मिळकतीचा कब्जा खरेदीखताद्वारे कायदेशीररित्या परमेश्वर तुपसमुद्रे यांचेकडून वादीस हस्तांतरीत करणेत आला होता याबाबत लेखी अथवा तोंडी पुरावा अभिलेखावर नाही. महत्वाची बाब म्हणजे वादीचा दावा मिळकतीमध्ये प्रत्यक्ष कब्जा व वहिवाट आहे हे शाबीत करणेकरीता वादीतर्फे इतर कोणताही सक्षम व सर्वोत्तम पुरावा अभिलेखावर सादर करणेत आला नाही. वादी दावा मिळकतीमध्ये पिक काढून उत्पन्न घेत आहे हे देखील शाबीत करणेकरीता कोणताही पुरावा सादर केला नाही. अशा परिस्थितीत दावा दाखल करतेवेळी तसेच आजरोजी वादीचे दावा मिळकतीमध्ये कायदेशीर कब्जे वहिवाट आहे असे अभिलेखावरील उपलब्ध पुराव्यावरुन निष्पण्ण होत नाही. परिणामी वादीस सदर बाब शाबीत करणेस अपयश आले आहे. त्यामुळे मी वादमुद्दा क्र. १ चा निष्कर्ष नकारार्थी देत आहे.

**<u>वादमुद्दा क्र. २ करीताः–</u>**

२९. वादीचे कथन असे की, प्रतिवादीचा दावा मिळकतीशी कोणताही संबध नसताना प्रतिवादी वादीचे दावा मिळकतीमधील वहिवाटीस बेकायदेशीररित्या हरकत अडथळा करत आहे. या अनुषंगाने हे नमुद करणे जरुरीचे की, उपरोक्त चर्चिलेप्रमाणे प्रतिवादी दावा मिळकतीचा मुळ मालक आहे. प्रतिवादीकडून परमेश्वर तुपसमुद्रे यांना दावा मिळकत हस्तांतरीत झाली असून त्यांचे मार्फत दावा मिळकतीचा कब्जा वादीस हस्तांतरीत झाला आहे ही बाब शाबीत करणेकरीता वादीने महत्वपूर्ण पुरावा सादर केला नाही. परिणामी, उपरोक्त चर्चिलेप्रमाणे दावा मिळकतीमध्ये वादीची कायदेशीर वहिवाट आहे हीबाब शाबीत झाली नाही. अशा परिस्थितीत प्रतिवादीतर्फे वादीचे कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करणेचा प्रश्न निर्माण होत नाही.

३०. वादाकरीता वादीची दावा मिळकतीमध्ये कब्जे वहिवाट आहे असे गृहीत धरले तरी प्रतिवादी त्याचे कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करत आहे हे शाबीत करणे वादीचे दायित्व आहे. वादीने वादपत्रामध्ये कथन केले की, प्रतिवादी वादीस दावा

मिळकतीमध्ये मेहनत, मशागत, वापर, उपभोग घेणेपासून मज्ञाव करत आहे. तसेच मजुरीने आलेल्या लोकांना शिव्या देवून त्यांना दमदाटी करतो, वादीचे शेत जमिनीमधील कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करतात तसेच वादीचे उभे पिकात जनावरे सोडणे असे गैरकृत्ये करतो. वादीने कथन केले की, दि. १०/११/२०२१ रोजी वादी दावा जमिनीत सोयाबीन पिक काढत असताना प्रतिवादी हे अनाधिकाराने आले व वादीस तू जमीन का खरेदी केली असे म्हणून दमदाटी करु लागले. सदर बाबी शाबीत करणेकरीता वादीने स्वतःची साक्ष नोंदवली नाही. वादीतर्फे कुलमुखत्यार वंदना कांबळे हिने तिचे सरतपासाचे शपथपत्रामध्ये सदर तथ्यांची पुनरावृत्ती केली आहे परंतु तिने सदर घटना समक्ष पाहिले आहेत अथवा दि. १०/११/२०२१ रोजी प्रतिवादीने हरकत केली त्यावेळी ती वादीसमवेत दावा जमिनीमध्ये होती असे कोणतेही स्पष्ट कथन केले नाही. त्यामुळे सदर घटनांची तिला व्यक्तिगत माहिती आहे असे शपथपत्राआधारे आढळून येत नाही. अशा परिस्थितीत प्रतिवादी सदर कृत्य करत आहे ही बाब शाबीत करणेकरीता वादीतर्फे सक्षम पुरावा सादर करणेत आला नाही.

३१. वादीतर्फे प्रतिवादीने मा. तहसिलदार, बार्शी, मंडल अधिकारी, सुर्डी, गाव कामगार तलाठी, सुर्डी यांना पाठवलेला अर्ज (नि. क्र. ४४) दाखल केला आहे. त्यावरुन प्रतिवादीने त्यांना गट क्र. १०९/३ या जमिनीमध्ये प्रत्यक्ष भेट देवून पंचनामा करणेत यावा अशी विनंती केली आहे. तसेच वादीतर्फे व परमेश्वर तुपसमुद्रे यांचे मंडल अधिकारी, पानगांव यांचे समोरील लेखी युक्तिवाद व मंडल अधिकारी, पानगांव यांचा दि. २५/०३/२०२१ रोजीचा आदेश (नि. ४५ व ४६) दाखल केले आहेत. यावरुन प्रतिवादीने दावा मिळकतीचे हक्कपत्रकी वादीचे नावाची नोंद करणेत येवू नये या करीता तक्रारी अर्ज दिला असून तो नामंजूर करणेत आला आहे असे निष्पण्ण होते. सदर कागदपत्रांवरुन प्रतिवादीने वादीचे दि. २९/१२/२०२० रोजीचे खरेदीखत दस्ताअन्वये नोंद करणेत येवू नये याबाबत हरकत घेतलेचे निष्पण्ण होते. परंतु यावरुन प्रतिवादी वादीचे दावा मिळकतीतील वहिवाटीस प्रत्यक्षरित्या हरकत अडथळा करत आहे असा निष्कर्ष काढता येणार नाही. प्रतिवादीहस्ते हरकत व अडथळा शाबीत करणेकीरता वादीतर्फे प्रत्यक्ष व स्पष्ट पुरावा अभिलेखावर सादर करणेत आला नाही. अशा परिस्थितीत अभिलेखावरील

उपलब्ध पुराव्या आधारे प्रतिवादी वादीचे दावा मिळकतीमधील कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करत आहे ही बाब शाबीत करणेस वादीस अपयश आले आहे. त्यामुळे मी वादमुद्दा क्र. २ चा निष्कर्ष नकारार्थी देत आहे.

**<u>वादमुद्दे क्र. ३ व ४ करीताः–</u>**

३२. प्रतिवादीचे कैफियतमधील बचाव असा की, त्यास आर्थिक अडचण असलेमुळे त्याने खाजगी सावकार परमेश्वर तुपसमुद्रे याचेकडे रक्कम रु. ३,००,०००/– मागणी केली होती. त्यावेळी तुपसमुद्रे याने त्यास सदर रकमेवरती ५ टक्के व्याज दरमहा द्यावे लागेल  व रकमेच्या बदल्यात प्रतिवादीची शेतजमीन पोकळ खरेदी खाजगी सावकार तुपसमुद्रे याचे नावे द्यावी लागेल अशी अट घातली. प्रतिवादीस पैशाची निकड असलेने त्याने ती अट मान्य केली. त्यावेळी प्रतिवादी व तुपसमुद्रे यांचेमध्ये सदर रकमेची परतफेड झालेनंतर प्रतिवादीची मिळकत प्रतिवादीस फेर खरेदी करुन देवू व मिळकतीचा ताबा प्रतिवादीकडेच राहिल असे ठरले होते. त्याप्रमाणे दावा मिळकतीचा ताबा तुपसमुद्रे यांना दिला नव्हता व तो प्रतिवादीकडेच राहिला होता. प्रतिवादीने कैफियतमध्ये असा बचाव घेतला असला तरी त्याने न्यायालयामध्ये स्वतःची साक्ष नोंदवली नाही. तसेच सदर बचावाचे पुष्टयर्थ कोणताही लेखी अथवा तोंडी पुरावा सादर केला नाही. त्यामुळे प्रतिवादीस त्याने दावा मिळकत परमेश्वर तुपसमुद्रे यांचेकडे गहाण ठेवली होती व दावा मिळकतीमध्ये त्याचा ताबा आहे ही बाब शाबीत करणेस अपयश आले आहे. त्यामुळे मी वादमुद्दे क्र. ३ व ४ चे निष्कर्ष नकारार्थी देत आहे.

**<u>वादमुद्दा क्र. ५ करीताः–</u>**

३३. सदर प्रकरणामध्ये वादीने प्रतिवादी विरुध्द निरंतर मनाईची मागणी केली आहे. प्रतिवादीने त्याचे कैफियतमध्ये वादी विरुध्द तीव्र बचाव घेतला आहे. परंतु प्रतिवादीतर्फे वादीतर्फे पुरावा आव्हानीत करणेत आला नाही अथवा बचावाचे पुष्टयर्थ कोणताही पुरावा सादर करणेत आला नाही. असे असले तरी, भारतीय पुरावा कायदा कलम १०१ व १०२ चे तरतुदी प्रमाणे वादीस दाव्यामध्ये यश प्राप्त करणेकरीता सक्षम पुरावा सादर करुन वादतथ्ये शाबीत करणे जरुरीचे आहे.

३४. उपरोक्त चर्चिलेप्रमाणे दावा मिळकतीमध्ये वादीची कायदेशीर कब्जे वहिवाट आहे ही बाब शाबीत करणेकरीता वादीतर्फे सक्षम, सर्वोत्तम व महत्वपूर्ण पुरावा सादर करणेत आला नाही. परिणामी, सदर पुराव्याअभावी वादीस दावा मिळकतीमध्ये त्याची प्रत्यक्ष कायदेशीर कब्जे वहिवाट आहे ही बाब शाबीत करणेस अपयश आले आहे. तसेच वादीस प्रतिवादीहस्ते दावा मिळकतीतील वहिवाटीस हरकत व अडथळा शाबीत करणेस देखील अपयश आले आहे.

३५. विशिष्ट अनुतोष अधिनियम, १९६३ चे कलम ३८ चे तरतुदीप्रमाणे वादीस प्रतिवादी विरुध्द निरंतर मनाई आदेश प्राप्त करणेकरीता दावा मिळकतीमध्ये त्याचा कायदेशीर कब्जा आहे व प्रतिवादी बेकायदेशीररित्या त्यास हरकत अडथळा करत आहेत अथवा तसा प्रयत्न करत आहेत हे शाबीत करणे जरुरीचे आहे. परंतु उपरोक्त चर्चिलेप्रमाणे सक्षम व महत्वपूर्ण पुराव्या अभावी वादीस सदर दोन्ही बाबी शाबीत करणेस अपयश आले आहे. परिणामी, विशिष्ट अनुतोष अधिनियम, १९६३ चे कलम ३८ चे तरतुदीप्रमाणे वादी प्रतिवादी विरुध्द निरंतर मनाई आदेश मिळणेस पात्र नाही. म्हणून मी वादमुद्दा क्र. ५ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

<u>वादमुद्दा क्र. ६ करीताः</u>–

३६. प्रतिवादीने कैफियतमध्ये बचाव घेतला की, वादीने महत्वपूर्ण बाबी लपवून ठेवल्या असल्याने सदर दावा चालणेस पात्र नाही. परंतु प्रतिवादीने वादीने नेमके कोणत्या बाबी लपवून ठेवल्या याबाबत स्पष्ट कथन केले नाही. तसेच सदर दावा चालणेस का पात्र नाही याबाबत देखील स्पष्ट कथन व पुरावा सादर केला नाही. त्यामुळे प्रतिवादीचे कथन की, दावा चालणेस पात्र नाही यामध्ये तथ्य आढळून येत नाही. त्यामुळे मी वादमुद्दा क्र. ६ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे.

<u>वादमुद्दा क्र. ७ करीताः</u>–

३७. प्रतिवादीने कैफियतमध्ये बचाव घेतला की, वादीचे दाव्यास कोणतेही संयुक्तिक कारण घडले नाही. त्यामुळे वादीचा दावा कारणा अभावी रद्द करणेत यावा. सदर

प्रकरणातील वादपत्राचे अवलोकन केले असता त्यावरुन दावा दाखल करणेस कारण घडले होते असे आढळून येते. परंतु वादीने पुरावा दाखल करुन सदर कारण शाबीत केले नाही. त्यामुळे सदर दावा दाखल करणेस कारण घडले होते ही बाब देखील वादीने शाबीत केली नाही. परिणामी, वादमुद्दा क्र. ७ चा निष्कर्ष मी नकारार्थी नोंदवित आहे.

**वादमुद्दा क्र. ८ करीताः–**

३८. सदर प्रकरणामध्ये वादीने प्रतिवादी विरुध्द निरंतर मनाईची मागणी केली आहे. परंतु वादीने सदर दाव्यामध्ये यश प्राप्त करणेकरीता आवश्यक व महत्वपूर्ण पुरावा सादर केला नाही. परिणामी, वादीस त्याचेवर ठेवणेत आलेले दायित्व पूर्ण करणेस अपयश आले आहे. उपरोक्त चर्चिलेप्रमाणे वादी निरंतर मनाई आदेश प्राप्त करणेस पात्र नाही. अशा परिस्थितीत वादमुद्दा क्र. १ ते ७ यावरील निष्कर्ष व कारणमीमांसा ध्यानात घेता प्रस्तुत दावा नामंजूर होणस पात्र आहे. सदर प्रकरणामध्ये वादीने महत्वपूर्ण पुरावा सादर केला नाही. त्यामुळे त्यास अपयश आले आहे. अभिलेखावरुन वादीने प्रतिवादी विरुध्द जाणीवपुर्वक खोटा दावा केला आहे असे आढळून येत नाही. अशा परिस्थितीत वादीवरती खर्च लादणे उचित होणार नाही. परिणामी, वादमुद्दा क्र. ८ चे निष्कर्षात खालील आदेश पारीत करणेत येतो.

## आदेश

१. दावा नामंजूर करणेत आला.

२. उभय पक्षांनी दाव्याचा खर्च आपापला सोसणेचा आहे.

३. प्रतिवादी विरुध्द अर्ज (नि. क्र. ५) वरील तात्पुरता मनाई आदेश संपुष्टात आला आहे.

४. येणेप्रमाणे हुकूमनामा करणेत यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.)

HARSHADA UMATAI UTTAM PATIL
Digitally signed by HARSHADA UMATAI UTTAM PATIL
Date: 2026.04.29 17:29:22 +0530

**(श्रीमती ह. उ. उ. पाटील)**

**दिनांकः २९/०४/२०२६.** **तिसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, बार्शी**

# CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | AA Chavan. |
| (b) | Court | : | Smt. H.U.U. Patil,<br>3rd Jt. Civil Judge,<br>J.D.& J.M.F.C.Barshi |
| (d) | Judgment /Order signed by P.O. on | : | 29/04/2026 |
| (e) | Judgment /Order uploaded on | : | 29/04/2026 |